**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रति,
संपादक/वृत्तसंपादक
कृपया प्रसिद्धीकरिता सादर

(बाळासाहेब झोडगे)
सहा.जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९६

प्रसिध्दी पत्रक क्र.२५
दिनांक : २४.०१.२०१९

## संपकालावधीतील 'बेस्ट' बसपासचा वैधता कालावधी वाढवून मिळणार

मुंबई, २४ - 'बेस्ट' उपक्रमाने प्रवाशांच्या सोयींकरीता बसपास योजना सुरु केलेली आहे. मंगळवार, **दि. ८ जानेवारी २०१९ ते दि. १६, जानेवारी २०१९** या कालावधीमध्ये बेस्ट कर्मचा-यांनी संप पुकारल्यामुळे या कालावधीत प्रवाशांना उपक्रमाच्या बससेवेचा लाभ घेता आलेला नाही. परिणामी, बसपासधारक प्रवाशांचे झालेले आर्थिक नुकसान विचारात घेऊन बेस्ट उपक्रमाने बसपासचा वैधता कालावधी **'९ दिवसांनी' अथवा बसपासच्या वैधता कालावधीतील उपभोगता न आलेल्या शिल्लक दिवसांच्या कालावधीकरीता विस्तारीत** करण्याचे ठरविले आहे.

**बसपासच्या पुढील नूतनीकरणाच्या वेळी** बसपासचा वैधता कालावधी विस्तारीत करुन दिला जाईल, याची सर्व बसपासधारक प्रवाशांनी नोंद घ्यावी. ही सुविधा उपक्रमाच्या **बसपास वितरण केंद्रांवर** उपलब्ध करण्यात आलेली आहे.

.........